# प्रकरण पाचवे

# उपसंहार

# प्रकरण : पाचवे

# उपसंहार

**प्रास्ताविक :**

१९६० नंतर मराठी साहित्यात लक्ष वेधून घेणाऱ्या दलित साहित्यातील एक महत्त्वपूर्ण शाखा म्हणजे 'दलित कादंबरी' होय. एकूण दलित साहित्याच्या तुलनेत दलित कादंबरीचा विकास फार मोठ्या प्रमाणात झालेला दिसून येत नसला तरी तो उपेक्षणीय नाही. 'दलित कादंबरी' ही सामाजिक वास्तववादी कादंबरी आहे. कादंबरीकार हा जसा तत्कालीन समाजाच्या भूतकाळ व वर्तमानकाळाच्या स्थिती गतीचा वेध घेणारा इतिहासकार व तसाच भाष्यकारही असतो.

या अनुषंगाने कोकण भागात वास्तव्यास असलेले माधव कोंडविलकर हे महत्त्वपूर्ण लेखक आहेत. दलित साहित्याचा प्रवाह अधिक समर्थ व प्रभावशाली करण्यामध्ये दलित लेखकांनी आपले योगदान दिलेले आहे. त्यामध्ये माधव कोंडविलकर हे एक अग्रगण्य साहित्यिक म्हणून ओळखले जातात. त्यांनी कथा, कविता, कादंबरी, नाटक, इटुकलेराव यासारखे बालवाङ्मय पुस्तक आणि शोधनिबंध लिहिला आहे. परंतु त्यांच्या लेखनाची म्हणावी तेवढी दखल समीक्षकांनी व अभ्यासकांनी घेतलेली नाही. म्हणून त्यांच्या कादंबरी लेखनाचा विचार या प्रबंधिकेत करण्याचे ठरविले आहे. त्यांच्या 'अनाथ' (१९८१) व 'आता उजाडेल' (२००१) या कादंबऱ्यांचे वाङ्मयीन परीक्षण या आधारे विचार केलेला आहे.

या प्रबंधिकेच्या पहिल्या प्रकरणात 'माधव कोंडविलकर यांची वाङ्मयीन जडणघडण' कशी झाली याचा सविस्तर आढावा घेतला आहे. कोंडविलकर यांना लेखनासाठी कोणाची प्रेरणा मिळाली, जीवन जगत असताना आलेले अनुभव आपल्या साहित्यातून आविष्कृत कसे केले. चर्मकार समाजाचे सखोल चित्रण करणारा पहिला

दलित लेखक, अनेक वाङ्मयप्रकार हाताळणारा लेखक तसेच दलित साहित्याला नवा आशय देणारे व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांचा विचार करण्यात आलेला आहे.

'मराठी कादंबरी व दलित कादंबरी : उद्गम आणि विकास' या दुसऱ्या प्रकरणात मराठी कादंबरी व दलित कादंबरीचा प्रारंभ ते २००२ पर्यंतचा आढावा घेतला आहे. कादंबरी या शब्दाचा कोशगत अर्थ सांगून मराठी व दलित कादंबरीचा विकास कसा होत गेला याचा सविस्तर विचार केला आहे.

बाबा पदमनजी यांनी १८५७ मध्ये लिहिलेली 'यमुनापर्यटन' ही मराठीतील पहिली कादंबरी मानायला हवी. तर हरिभाऊ आपटे यांनी 'मधली स्थिती' ही सामाजिक कादंबरी लिहून वास्तववादी कादंबरीला सुरूवात केलेली दिसते. 'चंद्रप्रभा विरहवर्णन' कादंबरी लिहून साळुबाई तांबवेकर यांनी मराठीतील पहिली स्त्री कादंबरीकार म्हणून मान मिळविला. ना. सी. फडके यांनी 'कुलाब्याची दांडी', 'अखेरचे बंड', 'दौलत' इत्यादी कादंबऱ्या लिहिल्या. तर वि. स. खांडेकर यांनी 'कांचनमृग', 'दोन ध्रुव', 'ययाती' यासारख्या मनोरंजनवादी कादंबऱ्या लिहून भर घातली. विश्राम बेडेकर यांनी 'रणांगण' मधून चाकोरी सोडून कादंबरीचे लेखन केले.

विभावरी शिरूरकर यांनी 'बळी' सारख्या कादंबरीतून गुन्हेगार जमातीचे वर्णन केले. त्यामुळे त्या स्त्री कादंबरीकार म्हणून नावारूपाला आल्या. स्वातंत्र्योत्तर काळात मराठी वाङ्मयाच्या प्रांतात बदल झालेला दिसतो. या काळात दलित, ग्रामीण आणि स्त्रीवादी साहित्य भरभराटीस आले. श्री. ना. पेंडसे यांनी 'एल्गार' व 'गारंबीचा बापू' मधून कोकणातील खेडे उभे केले. तर व्यंकटेश माडगूळकर यानी दुष्काळी प्रदेशाचे वर्णन 'बनगरवाडी' मधून केले. 'टारफुला' सारखी कादंबरी लिहून शंकर पाटील यांनी ग्रामीण प्रदेश उभा केला. ह. मो. मराठे यांनी 'निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी' मधून एका सुशिक्षित तरुण बेकाराची शोकांतिका दाखविली आहे.

दलित कादंबरीचा प्रारंभ ते २००२ पर्यंतचा आढावा घेतला आहे. दलित कादंबरीचा सर्वांगीण विचार करता दलितेतर लेखकांनी दलित जीवनावर ज्या कादंबऱ्या लिहिल्या तो एका सामाजिक स्तराला वाङ्‌मयीन क्षेत्रात यथायोग्य न्याय देण्याचा प्रयत्न केला. दलित कादंबरीचा विचार करता यामध्ये काही लेखक नव्यानेच लिहू लागले आहेत. त्यांना या कादंबरी माध्यमाने नीट आकलन करण्यामध्ये काही मर्यादा पडलेल्या दिसून येतात. वास्तविक कादंबरी हा व्यापक वाङ्‌मयप्रकार असल्याने व्यापक अशा जीवन आशयाला तो कवेत घेऊ शकतो. जीवनाच्या विविध पातळ्यातील ताणतणाव, माणसामाणसांतील नातेसंबंध, पात्राची मानसिकता इत्यादींची अलिप्तपणे अनुभूती घेऊन, त्याला विवेकशीलतेची जोड देऊन कादंबरीतून ते आविष्कृत होत गेलेले आहे. दलित जीवन जाणिवा अधिक प्रभावीपणे कादंबरीतून मांडले. हे दलित कादंबरीच्या विकासाला उपकारक आहे असे वाटते. अशाप्रकारे या प्रकरणात मराठी व दलित कादंबरी कशी उदयास येऊन, विकास पावत गेली. याचा परामर्श घेतला आहे.

यानंतर 'अनाथ' चे वाङ्‌मयीन परीक्षण या तिसऱ्या प्रकरणात चर्मकार समाजातील सुख, दुःखाचे वर्णन आलेले असून एका दलित कुटुंबातील मुलगा आर्थिक परिस्थिती नसतानाही त्यावर मात करून शिक्षण कसा घेतो याचे विस्तृत वर्णन आलेले आहे. भास्कर सारखा गरीब मुलगा दारिद्र्यावर मात करून शिक्षण घेऊ शकतो हे नायकाच्या माध्यमातून दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे. मुंबई सारख्या शहरातील झोपडपट्टीचे वर्णन करून, जागेचा प्रश्न हाताळला आहे. तसेच माणसांच्या वृत्ती, प्रवृत्तीवर प्रकाश टाकला आहे. 'अनाथ' कादंबरीमध्ये लेखकाने मुंबईतील झोपडपट्टीचे चित्रण केले असले तरी ते सखोलपणे करता आलेले नाही. अनेक वर्षापासून चालत आलेल्या रुढी-परंपरा, चालीरीती, अंधश्रद्धा चर्मकार समाजात

प्रकर्षाने दिसून येतात. या कादंबरीतून चर्मकार समाजावर जाती पंचायतीचे वर्चस्व दिसून येते. या कादंबरीमधून राजापूरी कोकणी भाषेचा वापर करून माधव कोंडविलकर यांनी मराठी वाङ्मयामध्ये मोलाची भर घातली आहे. १) कथानक, २) व्यक्तिचित्रणे, ३) प्रसंगनिर्मिती, वातावरण निर्मिती, संघर्ष, म्हणी, वाक्प्रचार, प्रतिमा, उपमा यांचा वापर करून कादंबरीचे वाङ्मयीन मूल्यमापन केले आहे.

'आता उजाडेल' या कादंबरीचे वाङ्मयीन परीक्षण या चौथ्या प्रकरणात सुशिक्षित व अशिक्षित पिढी म्हणजे एक पुरोगामी विचाराची पिढी तर दुसरी प्रतिगामी विचाराच्या पिढीचा संघर्ष चित्रित केलेला आहे. यामधून दलित जातीअंतर्गत जसे रोटी व्यवहार होतात तसेच बेटी व्यवहारही व्हायला पाहिजेत असा नवा दृष्टिकोन मांडला आहे. कादंबरीचा नायक सुधीर व नलिनी यांच्या प्रेम संबंधातून आंतरजातीय विवाहाचा प्रश्न हाताळलेला आहे. यांचा विवाह महात्मा फुल्यांच्या 'सत्यशोधक समाजोक्त' पद्धतीने केलेला दाखवून लेखकाने तरूण पिढीपुढे नवा विचार ठेवला आहे.

आबासाहेब देशमुख या पात्राच्या माध्यमातून सवर्ण लोक दलित लोकांच्यावर कसा अन्याय करतात हे दाखविले. तर बापूसाहेब होनाळकर याच्या माध्यमातून राजकारणी व्यक्तिचा ढोंगीपणा नजरेस आणून दिलेला आहे. या व्यक्ती नुसत्या बोलघेवड्या असतात. प्रत्यक्षात कृती मात्र करताना दिसत नाहीत. या पात्रातून राजकीय व्यक्तिंच्यावर प्रकाश टाकला आहे. 'आता उजाडेल' मधील स्त्रिया कष्टाळू, दुःखात देखील सुख मानून, येईल त्या संघर्षाला तोंड देऊन जीवन जगताना दिसतात. भारत देशामध्ये जातीयता किती खोल रूजली आहे याचा एक उत्तम नमुना या कादंबरीद्वारे पाहावयास मिळतो. लेखकाने या कादंबरीतून भावी तरूण पिढीसमोर उदात्त असा मानवतेचा विश्वव्यापक दृष्टिकोन मांडला आहे.

**निष्कर्ष :**

१. माधव कोंडविलकर हे श्रेष्ठ कादंबरीकार, आत्मकथा लेखक, नाटककार व दलित लेखक आहेत. त्यांची 'अनाथ' ही कादंबरी चांभार समाजातील सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक व शैक्षणिक जीवनवास्तव चित्रित करते. दलित जीवन वास्तवाचा वेध घेताना, प्रस्तुत कादंबरीत कोंडविलकर 'भास्करच्या' रूपाने शिक्षणाचे महत्त्व पटवून देतात. तर त्याउलट तत्कालीन समाज शिक्षणाला कमी महत्त्व देऊन, पारंपरिकतेकडे वळताना दिसतो. या सर्व परिस्थितीवर मात करून भास्कर शिक्षण घेतो. डॉ. आंबेडकरांनी दिलेला शिक्षणाचा मंत्र अप्रत्यक्षपणे कोंडविलकर 'अनाथ' या कादंबरीतून देतात.

२. 'आता उजाडेल' ही कादंबरी दलित समाजातील पोटजातीतील हेवेदावे, द्वेष, मस्तर, तसेच श्रेष्ठ कनिष्ठ भेदभाव स्पष्ट करते. माधव कोंडविलकर यांनी दलित समाजातील रोटी बेटी व्यवहार व्हावेत. म्हणून आंतरजातीय विवाहाचा प्रश्न मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. दलित समाजात हा प्रश्न कधी ना कधी रूढ होईल अशी आशा लेखकाला वाटते. हा महत्त्वाचा विषय लेखक मांडतो.

३. लेखकाने कोकणातील दलित जीवन चित्रित करीत असताना मुंबई झोपडपट्टीतील जीवनही चित्रित करण्याचा प्रयत्न केला आहे. कारण कोकणातील दलित माणसाला पूर्वीपासून मुंबईचे आकर्षण वाटत आले आहे. तो पोट भरण्यासाठी मुंबईला जातो. 'भास्कर' शिक्षणाच्या निमित्ताने मुंबईला जातो. भास्करच्या शिक्षणाचा प्रश्न असल्यामुळे लेखकाने मुंबईचे व झोपडपट्टीचे वर्णन तितकेसे सखोलपणे केलेले नाही.

४. माधव कोंडविलकर यांनी दलित जातीसमुहातील अंतर्गत जातीतील संघर्ष, द्वेष मस्तर, उचनीचपणा, श्रेष्ठ कनिष्ठ भाव, हेवेदावे, भांडण याचे चित्रण केले आहे. दलित जातीत चांभार समाजाचे स्थान काय आहे ते दाखवून देतात. इतर समाज व चांभार यातील समाजिक, धार्मिक, शैक्षणिक जीवनाची तुलना करतात. यातून असे दिसते की, डॉ. आबेंडकरांच्या शिकविणीचा फारसा परिणाम या समाजावर झाला नाही.

५. माधव कोंडविलकर यांनी या दोन्ही कादंबऱ्यातून आपणास आलेले अनुभव अगदी तटस्थपणे मांडलेले आहे. विशेष करून कोकणातील दलित माणूस कसा जगतो, त्याला मुंबईचे आकर्षण कसे आहे, किंवा शिक्षणापेक्षा पारंपरिक धंदा करून जगणेच तो उचित मानतो. कारण तो दलित चळवळीपासून नेहमीच दूर राहीला आहे. त्यामुळे त्यांच्या कादंबऱ्यात दलित चळवळीतील नायकाप्रमाणे आक्रमकता येत नाही. जे जगले, भोगले तेच मांडले अशी भूमिका दिसते.

६. कोकणातील खेड्यातील दलित जीवन तेथील रूढी, परंपरा, सण, उत्सव, चालीरीती, जगण्याचे सारे संदर्भ लेखक मोठ्या ताकदीने देताना दिसतो. जातीभेद, अस्पृश्यता ही कोकणात मोठ्या प्रमाणात पाळली गेली. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आबेंडकरांनी 'महाड' येथील 'चवदार' तळ्याचा सत्याग्रह केला आणि मानव मुक्तीच्या लढ्याची सुरूवात कोकणातून केली. परंतु कोंडविलकरांच्या कादंबऱ्यावर डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा म्हणावा तसा प्रभाव जाणवत नाही. पारंपरिकता जास्त जाणवते.

७. दलित समाजातील आगतिकता, कारूण्य, अन्याय, अत्याचार, वेदना याचे चित्रण करत करत, यातून कसे बाहेर पडायचे. याविषयीचे निर्व्याज धडपड प्रस्तुत कादंबऱ्यातील नायक करताना दिसतात.

माधव कोंडविलकर यांच्या 'अनाथ' व 'आता उजाडेल' या दोन कादंबऱ्यांचा अभ्यास केल्यानंतर, वाङ्मयीन अभिव्यक्ती बरोबर सामाजिकतेच्या अंगाने वरील निष्कर्ष काढता येतील.